# Rotary Club of Pune Katraj

Rotary | CREATE HOPE in the WORLD

# DARPAN

**Rotary Dist. 3131**
**Club No. 31609**

President : **Rtn. Milind Kulkarni** 94220 89888
Secretary : **Rtn. Asmita Patil** 98501 22383
Editor : **PP Vibhakar Ramtirthkar** 93710 01906

**Issue 6** **31 December 2023**


## Rotary Designated Month – Disease Prevention & Treatment




Disease prevention and treatment is one of the Rotary Foundation Areas of Focus. And for good reason. The health and vitality of a person, a family and a community can be seriously impaired by what in many cases is a preventable disease. Disease prevention is really a keystone to progress in other areas as well because of the interplay with other areas of focus like Water and Sanitation and Maternal & Child Health




## Message by RI President R. Gordon R. McInally



In December, I will attend the United Nations COP28 climate change summit in Dubai, United Arab Emirates. There, I will speak about the convergence of two global crises: climate and mental health. As the World Health Organization has noted, climate change worsens risk factors — such as disruptions to homes and livelihoods — for mental health problems. The emotional distress of a disaster also makes it difficult for people to recover and rebuild.

Rotary partner ShelterBox is an international disaster relief charity that has helped more than 2.5 million displaced people in approximately 100 countries with emergency shelter, essential household items, and technical support. I wish to share this month's column with their CEO, Sanj Srikanthan, who explains that the words we choose to describe disasters matter.

## संपादकीय – संपादक माजी अध्यक्ष विभाकर रामतीर्थकर



This is the last month of the year 2023. We get a golden opportunity every year to start afresh in January. That is the beauty of life. As for Rotary, half year will be over. Still half year will be remaining. In the enthusiasm, we did so many things in the first half of Rotary year. We should continue the same enthusiasm in the second half. Those who are working are doing wonderful work. Cheers to them! As for Darpan, I must mention Asmita, our club secretary, whose efforts are making Darpan readable every month. Quiz by Event Director Nukul is another activity which is drawing attention. Congratulations to all the winners! Now is the time to wish good bye to 2023. Let us do something greater, bolder, bigger in 2024!

## अध्यक्षीय मनोगत – अध्यक्ष मिलिंद कुलकर्णी



डिसेंबर महिन्याची सुरुवात नॉमिनेशन कमिटीच्या निवडणुकीने झाली. या निवडणुकीत माजी अध्यक्ष पुष्कराज मुळे आणि रो मिलिंद पाटील यांनी सर्व जबाबदारी संपूर्णपणे घेऊन निवडणूक यशस्वी पार पाडली. नॉमिनेशन कमिटीमध्ये माजी अध्यक्ष धनंजय हिरवे (चेअरमन), माजी अध्यक्ष अजित कुलकर्णी, माजी अध्यक्ष पुष्कराज मुळे, रो. मिलिंद पाटील, माजी अध्यक्ष प्रसाद गडकरी यांची निवड करण्यात आली. नॉमिनेशन कमिटीच्या पहिल्याच मिटिंग मध्ये रोटरी वर्ष २६–२७ साठी रो मिलिंद पाटील यांची अध्यक्ष म्हणून, तसेच रोटरी वर्ष २४–२५ साठीचे संचालक मंडळ यांची निवड करण्यात आली. या महिन्यात ॲनेट नाईट, कौन बनेगा करोडपती हा डिस्ट्रिक्ट तर्फे DRT च्या अंतर्गत घेण्यात आला. १७ डिसेंबरला रो कलेश आणि पल्लवी नेरुरकर यांच्या सौजन्याने तळेगाव दाभाडे येथे बावर्ची डे अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. रो विवेक कुलकर्णी यांच्या नियोजनातून श्री दत्तजयंती निमित्त भागवताचार्य श्री गणेश्वर पारखी गुरुजी यांचे दत्त भक्ती आणि उपासना या विषयावर प्रवचन आयोजित करण्यात आले होते. या वर्षी रोटरी क्लब ऑफ पुणे कात्रज गोदान या ग्लोबल ग्रँट प्रोजेक्ट मध्ये सिनर्जी पार्टनर म्हणून सामिल होत आहे. या प्रोजेक्ट मध्ये कात्रज क्लब मधील सभासद आणि हितचिंतक यांनी आपला सहभाग नोंदवला आहे. सर्वांना २०२४ च्या हार्दिक शुभेच्छा!

आत्ताच दिवस सुरू झाला...आणि बघता बघता संध्याकाळ सुध्दा झाली आहे, सोमवार होता असे वाटत होते...आणि रविवार आलासुद्धा.... महिना संपत आला,... वर्ष संपायला आले, अहो आता फक्त काही तासांचा अवधी राहिलाय... वयाची ४०, ५० वर्षे केव्हां निघून गेली हे कळलेच नाही. आपले आप्तस्वकीय, मित्र वगैरे हे जग सोडून गेले. मग समजेना...आता मागे कसे फिरायचे? जो काही वेळ आता आपल्याकडे उरला आहे त्याचा पूर्ण फायदा करून घ्या. आपल्याला जे आवडते ते करण्यासाठी आता थांबायचे नाही. आपल्या आयुष्यात रंग भरा.

छोट्या छोट्या गोष्टींमध्ये आनंद घ्या. हृदयात आणि मनात चैतन्य निर्माण करा. उर्वरित काळाचा आनंद जर लुटायचा आहे तर मग कुठलीही कृती पुढे ढकलू नका...... हे नंतर करीन,... हे नंतर सांगेन,... यावर नंतर विचार करीन, 'नंतर' आपल्या हातात आहे असे समजूनच आपण पुढे ढकलतो ना सगळे? आपण हे समजून घेत नाही की...चहा, कॉफी थंड झाल्यानंतर ...प्राधान्य बदलल्यानंतर ...उत्साह निघून गेल्यानंतर...आरोग्य बिघडल्यानंतर ...मुले वयात आल्यानंतर ...आई–वडील म्हातारे झाल्यानंतर ...आश्वासन न पाळल्यानंतर...दिवसाची रात्र झाल्यानंतर ...आयुष्याच्या शेवटच्या काळात......आपल्याला कळते, अरे बापरे...उशीर झाला की ...म्हणूनच 'नंतर' काही ठेवू नका. कारण, 'नंतर' ने 'अंतर' वाढते व चांगल्या गोष्टी, चांगले क्षण हातातून निसटून जातात. दिवस आजचा ...आणि क्षण आत्ताचा ...आजची गोष्ट उद्यावर ढकलणे आपल्याला झेपणारे नाही, कारण आता आपले वय उतरणीस लागले आहे.




बघूया हा संदेश इतर लोकांपर्यंत कोण कोण पोहोचवीत आहे? कारण...हा संदेश नंतर पाठवीन असा कोणी विचार केला तर ...... तर कदाचित तो पुढे कधीच पाठविला जाणार नाही. जे वयस्कर नाहीत त्यांच्या पर्यंतसुद्धा हा संदेश पोहचवा. नाहीतर आहेच नंतर.

सर्वजण आरोग्य संपन्न, सकारात्मक व आनंदी राहोत हीच नवीन २०२४ वर्षाच्या सदिच्छा.

## फर्स्ट लेडी मनोगत – मुग्धा कुलकर्णी



डिसेंबर मधील नॉमिनेशन कमिटी इलेक्शन, Annets nite, कौन बनेगा करोडपती, बावर्ची डे, दत्तजयंती निमित्त कार्यक्रम अश्या या अविस्मरणीय धडाकेबाज कार्यक्रमांनी हा महिना अगदी उत्साहात, आनंदात साजरा झाला. सर्व सभासदांचा सहभाग आणि सहकार्य यांनी त्यात अजून छान भर पडली. बघता बघता सहा महिने अगदी खेळीमेळीने पार पडले. सर्वांचे मनापासून धन्यवाद!

# Review of Weekly Meetings

## 2 Dec – GenZ Fest – Annet's Night



इव्हेंट डायरेक्टर रो नुकुल दिनकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या ॲनेट नाईट (Gen-Z Fest) ह्या नाविन्यपूर्ण कार्यक्रमात क्लब मधील सर्व ॲनेटनी आपल्या विविध गुणदर्शनाचे उत्साहात प्रदर्शन केले. यामध्ये गेम्स, गाणी, डान्स, स्पीच आणि एक आगळावेगळा उपक्रम Shark tank pitch सादर केला गेला. या कार्यक्रमास क्लब मधील ६५ पेक्षा जास्त सभासद उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नक्षत्रा आणि वरदा यांनी केले. या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात मधुरा दिनकर यांच्या मोलाचा वाटा होता, कार्यक्रमाचे शेवटी माजी अध्यक्ष अजित दादा आणि सुचित्रा यांच्यातर्फे सर्वांना भेट वस्तू देऊन कौतुक करण्यात आले. Shark tank pitch साठी माजी अध्यक्ष अनंत तिकोने आणि रो उदय थत्ते यांनी सहभागी ॲनेटना अभ्यासपूर्ण प्रश्न विचारून मुलांच्या ज्ञानात मोलाची भर घातली. या सोबतच रोटरीच्या प्रोटोकॉल नुसार नॉमिनेशन कमिटीचा निवडणूक कार्यक्रम राबविण्यात आला. ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आलेल्या या निवडणुकीत माजी अध्यक्ष पुष्कराज मुळे आणि रो मिलिंद पाटील यांनी सर्व जबाबदारी संपूर्णपणे घेऊन निवडणूक यशस्वी पार पाडली. या निवडणुकीत ९३% मतदान झाले. या नॉमिनेशन कमिटीमधे माजी अध्यक्ष धनंजय हिरवे (चेअरमन), माजी अध्यक्ष अजित कुलकर्णी, माजी अध्यक्ष पुष्कराज मुळे, माजी अध्यक्ष प्रसाद गडकरी, रो मिलिंद पाटील यांची बहूमताने निवड करण्यात आली. निवडणूक प्रक्रिया सुरळीत आणि यशस्वी आयोजन केल्याबद्दल रो पुष्कराज मुळे यांचे विशेष अभिनंदन आणि आभार. माजी अध्यक्ष अजित दादा आणि सुचित्रा यांच्या स्वादिष्ट फेलोशिपने साप्ताहिक सभेची सांगता झाली.

## 9 Dec – Kaun Banega Crorepati by DRT & DGND




आपल्या साप्ताहिक सभेत रोटरी डिस्ट्रिक्टतर्फे DRT ह्या नाविन्यपूर्ण उपक्रमात क्लबमध्ये कौन बनेगा करोडपती हा कार्यक्रम घेण्यात आला. हा कार्यक्रम डिस्ट्रिक्ट तर्फे मेंबरशिप डायरेक्टर रो नितीन ढमाले आणि DRT नाना पाटील यांनी संयुक्तपणे सादर केला. या कार्यक्रमात कात्रज क्लब मधील सर्व वयोगटातील सभासद सामिल झाले होते. या कार्यक्रमात रोटरीबद्दलची माहिती आणि सामान्य ज्ञानाची जोड देऊन अगदी योग्य पध्दतीने विविध प्रकारचे प्रश्न विचारून स्पर्धकांना खरेच KBC मधे सहभागी झाल्याचा आनंद वाटला. या कार्यक्रमात रो. नितीन ढमाले यांची ओळख AG रो अनंत तिकोने यांनी ओघवत्या शैलीत करून दिली. यानंतर २०२६-२७ वर्षांकरिता डिस्ट्रिक्ट गव्हर्नर म्हणून बिनविरोध निवड झाल्याबद्दल क्लबतर्फे रो नितीन ढमाले यांचा सत्कार करण्यात आला. रो. ढमाले यांची DGND म्हणून निवड झाल्यानंतर ही पहिलीच सभा होती. या कार्यक्रमात विजेत्या स्पर्धकांना डिस्ट्रिक्ट आणि क्लबतर्फे पारितोषिके देण्यात आली.

## 17 Dec – Bavarchi Day



ॲडमिन डायरेक्टर माजी अध्यक्ष विद्या पाटील आणि फेलोशिप चेअरपर्सन सुचित्रा कुलकर्णी यांच्या नियोजनातून आयोजित करण्यात आलेला बावर्ची डे अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला, रो. कलेश आणि ॲन पल्लवी नेरुरकर यांच्या सौजन्याने श्री व सौ वर्दे यांच्या वेदांती या तळेगाव दाभाडे येथे बंगल्यावर क्लबमधील सर्व बावर्ची भावी अध्यक्ष समीर प्रभुणे यांच्या मार्गदर्शनाखाली मेनू ठरवणे, स्वयंपाक करणे, गप्पा गोष्टी करत, एकमेकांची थट्टा मस्करी करत सर्वांनी सहभागी होऊन याचा आनंद घेतला. ॲनेट पिनाक नाईक यांनी तयार केलेल्या खास बावर्ची डे स्टिकर मुळे आणखीन मजा आली. साहित्य आणि भांडी मिळवण्यासाठी रो. उदय थत्ते यांची मोलाची मदत झाली. शनिवारी सायंकाळी सर्व साहित्य जमा करणे, भाजी, फळे, दुध, आईस्क्रीम, राहण्याची व्यवस्था आणि शनिवार संध्याकाळची जेवण्याची व्यवस्था करण्यात कलेश, पल्लवी आणि लिटिल मास्टर अश्वथ यांनी हिरीरीने सहभागी होऊन तयारी केली होती. रविवारी सकाळी आलेल्या सर्वांचे स्वागत गरमागरम चहा, कॉफीने करत या आनंद सोहळ्याची सुरुवात झाली. मग कांदा चिरून आणि झणझणीत तर्रीवाली मिसळचा आस्वाद घेत उत्साहात सुरुवात झाली, स्पेशल थंडगार CURCO सरबतानंतर बिर्याणी आणि फ्रुटसॅलडची तयारी सर्वांनी केली, सर्वांनी या सगळ्याचा पुरेपूर आस्वाद घेतला. दुपारी मिटिंग मध्ये नॉमिनेशन कमिटीच्या निवडणुकीबाबत कुणाचीही हरकत आली नसल्याने रो. मिलिंद पाटील अध्यक्ष २६–२७ आणि संचालक मंडळ २४–२५ यांची निवड अधिकृतपणे जाहीर करण्यात आली. सोबत माजी अध्यक्ष नितीन आणि रो. विराज यांनी यावर्षी रोटरीसाठी तयार करण्यात आलेल्या जाकीटचे अनावरण केले, आलेल्या सर्वांची साईजप्रमाणे नोंद करण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी रो वर्षा हिरवे यांनी खुमासदार शैलीत आभारप्रदर्शन केले, सोबत सहभागी बावर्चींचा हिरवे कुटुंबीयांतर्फे भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. या अशा कार्यक्रमातून रोटरीला अपेक्षित अशी फेलोशिपचा अर्थ सार्थ ठरत आहे. एकमेकांना समजून घेऊन, काळजी घेत संघभावना जागृत होत आहे. कात्रज क्लब मधील सर्वांचे bonding आणि एकी दिसुन आली. या मधुन आपण अजून समृद्ध होत आहोत.

## 23 Dec – Shri DattaJayanti Celebration






आपल्या साप्ताहिक सभेत सर्व्हिस प्रोजेक्ट डायरेक्टर रो विवेक कुलकर्णी यांच्या पुढाकाराने भागवताचार्य श्री गणेश्वर पारखी गुरुजी यांचे श्री दत्तजयंती निमित्त दत्तभक्ती आणि उपासना या विषयावर प्रवचन आयोजित करण्यात आले होते. रो. धनंजय आणि रो वर्षा यांच्या गरमागरम मसाला दुधाने सर्वांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे सुरवातीला मेंबरशिप डायरेक्टर रो प्रसाद गडकरी यांनी या वर्षीच्या रोटरी आणि रोट्रॅक्टच्या मानद सभासद म्हणून नवोदित अभिनेत्री प्रियदर्शिनी इंदलकर हिची ओळख करून दिली. यानंतर त्यांचे इंडक्शन करण्यात आले. पुढील कार्यक्रमात वक्ते श्री गणेश्वर पारखी गुरुजी आणि श्री नांदे काका यांची ओळख रो. विवेक यांनी करुन दिली. आपल्या तासाभराच्या प्रवचनात भागवताचार्य श्री गणेश्वर पारखी गुरुजी यांनी दत्त जयंती निमित्त ईश्वरावरील भक्ती, शक्ती, दान कसे करावे आणि उपासनेचे महत्त्व विषद केले. श्री नृसिंह मंदिरातील निस्सिम भक्त असलेल्या श्री पारखी गुरुजींच्या ओघावत्या शैलीत उपस्थित सर्व सभासद भक्तीरसात रंगून गेले. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन रो प्रदीप सिंदेकर यांनी केले. रो अनिल कुलकर्णी आणि परिवार यांच्या रुचकर फेलोशिपचा आस्वाद घेत कार्यक्रमाची सांगता झाली.

## 30 Dec – Club Assembly 2

शनिवार दि ३० डिसेंबर रोजी आपल्या साप्ताहिक सभेत क्लब असेंब्ली क्र २ ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आली. या कार्यक्रमास AG सचिन देशपांडे उपस्थित होते. उपस्थित सर्व क्लब डायरेक्टरनी आपापल्या पोर्टफोलिओ मधे केलेल्या कामाची माहिती दिली आणि पुढील सहा महिन्यांचे नियोजन सादर केले. कार्यक्रमाचे शेवटी AG सचिन देशपांडे यांनी सर्व डायरेक्टरचे चांगल्या कामासाठी कौतुक केले. डिस्ट्रिक्टमधे क्लब पहिल्या पाच क्रमांकात असल्याने अभिनंदन केले आणि पुढील कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या. अशा प्रकारे रोटरीचे या वर्षातील सहा महिने उत्साहात पूर्ण झाले आहेत.

## Youth – Rotaract – Donation of winter clothing & Footwear to needy street people



Rotaract Club Of Pune Katraj donated a lot of winter clothing and footwear to the needy people on the street. It was a humbling experience as we could see the happiness and satisfaction in their eyes after getting these clothes. We donated 1000+ clothes in the span of a week. Thank you to all the Rotarians who have supported and helped us in this activity. We hope and wish to do many more such activities.

## 23 Dec - Youth – Interact – Installation of Interact Club of Z P School Yewalewadi




Interact Club of ZP School Yewalewadi was installed by chief guest PP Gajanan Lupane. Youth Director Kalesh Nerurkar anchored the program. 10 teachers were present along with 50 students. 5 Rtn & 1 Ann attended the program. Program started with Saraswati Pujan, Chief Guest PP Gajanan Lupane guided the students about building good personality.

## Review of District Events

### 10 Dec – Dinner with DG – Rtn Chitra Kulkarni



नवीन सभासदांना रोटरीची माहिती करून देण्याच्या निमित्ताने हा कार्यक्रम पुनावळे येथे आयोजित केला होता. आपल्या क्लबमधून मी, अस्मिता व शलाका गेलो होतो. त्याच दिवशी डीजी मंजू सहा दिवसांची कार रॅली संपवून परत येणार होत्या. आम्ही पोचलो तेव्हा यजमान क्लबचे सभासद त्यांच्या स्वागताची जय्यत तयारी करून वाट पाहत होते. आम्ही सभागृहात गेलो तेव्हा तिथे रोटरीच्या चित्रफिती दाखवत होते. माजी प्रांतपाल मोहन पालेशा यांनी आपल्या प्रभावी वक्तृत्वाने सर्वांना आपलेसे करून घेतले. रोटेरिअन झाल्यानंतर अशा उत्तम वक्त्यांच्या भाषणाचा आनंद मिळेल असे जणू सूचित करण्यात आले. त्यांच्या शेरोशायरीमुळे त्यांचे भाषण संपूच नये असे वाटत होते. मला मधल्या मोकळ्या वेळात त्यांनी माझ्या अमिताभ बच्चन व एम एस धोनीवरच्या कविता सादर करण्याची संधी दिली याचा मला खूपच आनंद झाला. मग कार रॅलीच्या संघाचे डीजींसोबत आगमन झाले. सर्वांनी फेटे बांधले होते त्यामुळे असे वाटत होते कि एक मोठी लढाई जिंकून हे सर्व सैनिक आले आहेत. त्या सर्वांचा यथोचित सत्कार झाला. डीजी मंजूनी कार रॅलीचा अनुभव सांगितला, तेव्हा असे वाटले कि मी या कार रॅलीला जायला हवे होते. पुढे माजी प्रांतपाल मोहन पालेशा यांनी रोटरीच्या फीची विभागणी कशी होते याचा हिशोब समजावून दिला. उपस्थित सभासदांच्या प्रश्नांची डीजींनी हसतखेळत उत्तरे दिली. नंतर सुग्रास जेवणाचा आस्वाद घेऊन आम्ही परत निघालो.

## 4 to 10 Dec : District Car Rally Parikrama in DG's words



All in all, a very satisfying, fulfilling and enriching experience.

Starting with DS Unmesh and DS Vivek for initiating the planning process, Vivek for acting quick on hotel bookings, Abhijit for wonderful designs of car stickers, flyers, Mementos, gift items and much more. It was heartening to see everybody following the instructions given by the convenor Ravindra aka Vishwas and it was more heartening to see the convenor and host club presidents, Ashok and Vijay and their teams taking such good care of the arrangements. As a Governor, I was left with hardly any work during the rally other than following the instructions of the leader of the rally, Convenor, Ravindra and probably that's why I enjoyed the rally even more. New friendships being built and learning so much more about the old friends is surely a heady mix and we all will cherish the memories for a long time to come. After the flag off from DG office, Pune by DGE Shital Shah and DGN Santosh Marathe, rally started its unique journey where Governor led from the front, initiating the tie ups with all concerned district governors and ensuring proper arrangements. And also, the first time we implemented our own projects in other districts enroute: Project Asmita, Multi District RYLA, Vocational Excellence Award, two industrial visits.

Other highlights are-

1. RID3131: Breakfast at Panvel Industrial Town and flag off from Panvel by PDG Dr Deepak Purohit, PDG Dr Shailesh Palekar and IPDG Dr Anil Parmar.
2. RID 3141: Visit to Astha Dialysis Centre run by RC Manor for adivasi padas near Palghar.
3. RID 3141: Visit to Nursing course institute run by RC Manor for girls from Jammu & Kashmir. They have trained more than 100 students till now.
4. RID 3141: Visit to the Gallery of Past RI President Kalyan Banerjee. Various mementos and gifts from across the world on display. Saw a memento given by RID 3131 as well.
5. RID 3060: Visit to the multi-speciality Rotay Hospital spread across 6 acres of land.
6. RID 3060: Joint meeting with all 4 clubs of Vapi.
7. RID 3060: Implementation of Project Asmita at Statue of Unity for girls from nearby adivasi padas and adivasi girls working in various operations at Statue of Unity.
8. RID 3060: Visit to Statue of Unity and laser show
9. RID 3060: Darshan at Beautifully Built Swaminarayan Temple by BAPS at Poicha.
10. RID 3060: Inauguration ceremony of Global Grant project of RC Anand Milkcity at Anand in presence of TRF Trustee PDG Dr. Bharat Pandya.
11. RID 3060: Industrial visit to the largest Dairy in the world, Amul Dairy.
12. RID 3055: Attended Governor's official visit meeting of DG Mehul Rathod to RC Ahmedabad Majestic Stars
13. RID 3055: Wonderfully organised Multi-District RYLA for the girls of Sainiki School of Ganapat University along with RC Mehsana. This was made possible due to tremendous efforts of District Director - New Generation, Rtn Vishnu Mhantre and his team who travelled all the way to Mehsana, Ahmedabad for this RYLA.
14. RID 3055: Visit to one of the best designed crematoriums built and being operated by RC Mehsana. So thoughtfully designed considering the needs of people in grief very emphatically. They also have a Physiotherapy center for poor patients in their own Rotary Bhavan premises.
15. RID 3055: Vocational Service Excellence Award to the Founder President and Patron in Chief, Dr Ganapat Patel. What an amazing and yet such a humble personality. Ganapat University (GUNI) spread across 250 acres of land.
16. RID 3056: Dinner organised by Rtn Ritu at Udaipur. This was me time for rallyers. Each participant spoke about their own business and family and their experience of the rally. The highlight of the evening was typical lal manss (famous mutton of Udaipur) being served after 2 days of only Veg meals and of course the music, dance and masti that followed.
17. RID 3040: Grand welcome by RC Neemach at their Rotary Bhavan.
18. RID 3040: Darshan of Mahakaleshwar, one of the 12 Jotirlingas in India. A specially organised Darshan and superb lunch by RC Ujjain.
19. RID 3040: A grand spread of typical Indore Sarafa cuisine by the District Governor Ritu and DGE Anish. What a fabulous menu it was! So many different varieties. Had a great time trying them.
20. RID 3040: Visit to Indore Sarafa Bazar just for an experience if not to eat anything since we were already full with the spread arranged by DG Ritu.
21. RID 3040: Breakfast at Sendhava and visit to their Dialysis center, Happy School and Happy Anganwadi Project. A small rural club with huge work for sure.
22. Another grand lunch of typical cuisine served in the region by a newly chartered club of RC Malegaon Vision. Set in a complete rural ambience of KHAT and tables.
23. Industrial Visit to Sula Vineyard and wine testing
24. Gala Night on the last night of the rally. Bestest of the foods and fellowship along with DJ and dance. What fun we had! Other Rotarians from our home district 3131 joined in from Pune for this wine fellowship along with District Fellowship Director, Rtn Yogesh Bhide and his team.
25. Special Darshan at Shirdi to take divine blessings of Shree Sai Baba.
26. RID 3131: Grand welcome back into home district 3131 by RC Alephata Central, the co-host club of the rally. They organised a Varat in the town and made us all wear Phetas. This was followed by a typical Maharashtrian lunch of Bhakri, Bharali Vaangi, chatani and what not! Participants were overwhelmed by the hospitality of the Co-hosts
27. RID 3131: Rally ended at Blue Water Hotel at Ravet, Pune over a high-tea, felicitations of all participants and distribution of mementoes and gifts to all. We also felicitated the newly elected District Governor for RY 2026-27, Rtn Nitin Dhamale.

## कविता – रो. प्रदीप सिंदेकर

गुलशन है आबाद हमारा, खिलते हुए फूलोंसे 'कात्रज' है आबाद हमारा, खिलते हुए फूलोंसे।
चमकती है चाँदनीसी 'नक्षत्रा', गूँजता 'आरोह' बातोंसे 'कात्रज' है आबाद हमारा, खिलते हुए फूलोंसे
आस है कल की 'अक्षा' में, 'अन्विता' भारी तिजारतसे कात्रज है आबाद हमारा, खिलते हुए फूलोंसे।
बाकी भी है रंग अलग, अलग है अपनी पहचानसे कात्रज है आबाद हमारा, खिलते हुए फूलोंसे।
'वरदा' भरती जोश और बच्चे, करते मेहनत शिद्दतसे कात्रज है आबाद हमारा, खिलते हुए फूलोंसे।

## Bavarchi Day Thanks – Rtn Varsha Hirwe

दिवस आज भाग्याचा ।
सगळ्या बायकांनी ऐते बसून जेवायचा ।
बल्लवाचार्य दिवसाचा योग आला जुळून ।
सगळ्या बल्लवानी तयारी केली आहे झोकुन ।
विद्यमान अध्यक्ष व दोन वर्षानी होणारे अध्यक्ष
मिलिंद लागले तयारीला।
भावी अध्यक्ष समीरने घेतले सुत्र हाती ।
त्याला साथ गणेश विराज, नुकुल व प्रसाद देती ।
रामचंद्र, विभाकर, राजु व धनंजय तसे लुटुपुटीचे सवंगडी ।
पण दिल्या महत्त्वपूर्ण सुचना घडोघडी।
आलोक, नितीनने जबाबदारीने बधितले व्यवस्थापन ।
त्यामुळे झाले छान कार्यक्रमाचे आयोजन ।
आणि हो या सर्वासाठीही जागा उपलब्ध करुन दिली
आपल्या क्लबच्या गुणी बाळाने म्हणजे कलेश व पल्लवीने ।
यासाठी पल्लवीच्या आईवडीलांचे खूप खूप आभार ।
वर्दे व नेरुरकर कुटुंबियांचे चोख व्यवस्था ठेवण्यासाठी खूप खूप आभार, सर्वात शेवटी आपण सर्वजणांनी या कार्यक्रमास हजेरी लावत सर्व बल्लवांचा उत्साह द्विगुणित केला, यासाठी सगळ्यांचेच मनःपुर्वक आभार व धन्यवाद।

## Chef's words on Bavarchi Day
## PE Sameer Prabhune



नमस्कार मंडळी! आपण सगळ्यांनी आज जो आनंद लुटला, त्यालाच रोटरी च्या भाषेत Fellowship म्हणतात. पण आपण सगळ्यांनी मिळून त्यापलीकडे अनुभवले! सगळेजण खूप राबत होते आणि ते राबणे मनापासून एन्जॉय करत होते. ह्या सगळ्यात खरं कौतुक कलेश, पल्लवी आणि विशेष करून अश्वथ ह्यांचे आहे. फक्त जागाच नाही तर सर्व सामान, शेगडी, पातेली, ह्याची अथक व्यवस्था न कंटाळता केली! सगळं झाल्यावर आम्ही घातलेला पसारा सुध्दा तितक्याच हिरीरीने अवरला, त्याची विशेष नोंद घ्यावी लागेल. अन् ह्याची सुरेल नोंद केल्याबद्दल हिरवे कुटुंबीयांना पण मानले पाहिजे. जे आले नाहीत, त्यांनी काय गमावले ते आम्हालाच माहीत आहे! अन्नपूर्णेमुळे सर्व झाले, आम्ही फक्त निमित्तमात्र होतो! असेच परत भेटू!






## बल्लवाचार्य दिन – पीएनडी मिलिंद पाटील



व. पु. काळे यांच्या आवडत्या विशेषणामध्ये बेदम हे विशेषण अनेक वेळा वापरलेलं दिसुन येतं. आज मला ते वापरायचा मोह आवरत नाही. मी यापुर्वी कधीही पुर्ण मिसळ दोनदा खाल्लेली नाही. आहाहा! हॅट्स ऑफ टू प्रधान बल्लवाचार्य समीर. उप–बल्लवाचार्य गणेशच्या चवीच्या अंदाजाचे कौतुक. आजच्या मेनुतील पदार्थावर आम्ही बेऽऽऽदम ताव मारला. प्रत्येक पदार्थाची प्रोसेस आणि चव खुपच वेगळी, पुर्वी न अनुभवलेली. आजच्या दिवसाचं आणि पदार्थांचं पुर्ण वर्णन करायचं म्हणजे एक मोठा लेख होईल. ते पुन्हा कधीतरी, पण आजच्या प्रसंगांचं वैशिष्ठ्य म्हणजे, आपली वयं विसरुन जेष्ठ बल्लवाचार्यांनी उत्स्फुर्तपणे घेतलेला सहभाग. भाज्या आणि फळं कापताना मारलेल्या मन मोकळ्या गप्पा आणि व्हिडीओ रील बनवण्यात केलेलं मनोरंजन, याचं खरं तर कौतुकच केलं पाहीजे. त्यांचा उत्साह तरुणांनाही लाजवणारा होता. आज सुग्रणीला पुल्लिंगी शब्द सुग्रीव सुचला. सुग्रणींनी केलेल्या सुग्रीवांच्या कौतुकामुळे दिवस सार्थकी लागला. सर्व सुग्रीवांचे आभार. आजच्या कार्यक्रमासाठी नेरुरकर कुटुंबाने केलेल्या मदतीचेही कौतुकच. त्यांनी व्हेन्यु उपलब्ध करुन दिला, पण त्यांना खुप त्रास सहन करावा लागला. आमच्याकडून काही मदत करणे राहुन गेलं असल्यास माफ करा. आम्हाला व्हेन्युपर्यंत नेऊन आणल्याबद्दल सचिव अस्मिता मॅडम यांचे विशेष आभार. वर्षा मॅडम यांची आभारप्रदर्शनपर कविता आणि हिरवे कुटुंबाने कौतुकाने पाठीवर थापरुपी दिलेला रुमाल याने शेवट गोड झाला. घाईत काही उल्लेख राहीला असल्यास क्षमस्व. प्रेसिडेंट, फर्स्ट लेडी, कुहु–अक्षा यांनीही भरपुर तयारी केलेली होती. सर्वांनीच भरीव योगदान दिले. त्यामुळे प्रत्येकाचे प्रत्येक गोष्टीसाठी धन्यवाद.

## गुंतवणूक – प्रेसिडेंट मिलिंद कुलकर्णी

नेहमी गुंतवणूक म्हणले की पैश्याच्या संदर्भात असावे असे वाटते, पैश्यासोबत वेळ, संबंध, ज्ञान यांची योग्य ठिकाणी केलेली गुंतवणूक ही नेहमीच लाभदायक ठरते. आयुष्यात आपण आपल्यात गुंतलेलो असलेले हे कधीही चांगलेच समजायचे असते, कारण तोच आपला खरा प्रगतीचा मार्ग असतो. जेव्हा दुसऱ्यावर भाळणं संपतं, तेव्हा उरतं ते स्वतःला सांभाळणं, म्हणून स्वतःला योग्य वेळ द्या. तुम्हाला तुमच्याशिवाय कोणीच समजून घेऊ शकत नाही. स्पर्धा ही दुसऱ्यासोबत नाही, तर स्पर्धा ही आयुष्यभर स्वतःचीच स्वतः सोबत असते. फक्त आपण वास्तव न ओळखता दुसऱ्यासोबत स्पर्धा चालु आहे हे समजून जगत असतो. जगायचे एकट्यानेच आणि मरायचे देखील एकट्यालाच आहे. पण आपण लोकांमध्ये जास्त गुंतून आपल्या मनासारखे नाही झाल्यास नशिबाला दोष देत बसतो व आपल्या हातातील अनमोल वेळ ही कळत नकळत घालवत असतो. हिच वेळ समाजाला तुमच्या कर्तुत्वाची थाप तुमच्या पाठीवर देण्यासाठी परिपुर्ण असते म्हणून वेळेला किंमत द्या. आज तुम्हाला जे वेळ देत नाहीत उद्या तीच लोकं तुमच्या क्षणभर भेटीसाठी तरसतील हे नक्कीच. स्वतःला वेळ देणाऱ्या माणसाला एक ना एक दिवस पुर्ण समाज वेळ देत असतो.








The Rotary Foundation

## Heartiest Congratulations!

- Hon **Rtn & Rtr Priyadarshini** was awarded as best actress for Fulrani Movie in Konkan Film Festival and also awarded with Savitrichi Lek puraskar for best actress.
- **PP Ramchandra Raut** is elected as Treasurer of Navchaitanya Hasya Yog Pariwar.
- **PP Ramchandra Raut** participated in Pune Half Marathon of 3 km arranged by Bajaj Allianz.
- **Annet Avani Bharati** won award for Interstate dance competition.

## जीवेद शरद: शतम्




| | |
|---|---|
| Miss Tejashree Talekar | 03 Dec. |
| Rtn Hemant Watve | 03 Dec. |
| Annet Sarthak Gulunjkar | 06 Dec. |
| Mr Siddheshwar Palange | 07 Dec. |
| PP Atul Durve | 09 Dec. |
| Mr Parikshit Bhisey | 13 Dec. |
| Mrs Amruta Mahajan Pattanshetti | 17 Dec. |
| Miss Sneha Thatte | 18 Dec. |
| Miss Prachi Kale | 19 Dec. |
| Mrs Shivani Gadkari Kapur | 23 Dec. |
| Dr Miss Amala Ghalsasi | 25 Dec. |
| Mr Ketan Talekar | 25 Dec. |
| Mrs Madhura Hirve Joshi | 27 Dec. |
| PP Abhhey Bhisey | 29 Dec. |
| Mrs Sharmishtha Gadkari Ghodake | 31 Dec. |

## नांदा सौख्यभरे




| | |
|---|---|
| Rtn Ganesh & Aparna Hadke | 01 Dec. |
| PP Dr Prabhakar & Jayashree Mahajan | 04 Dec. |
| Rtn Shashikant & Pushpa Bharati | 09 Dec. |
| PP Prasad & Deepali Gadkari | 15 Dec. |
| PP Dhananjay & Varsha Hirve | 15 Dec. |
| PP Atul & Swapna Durve | 29 Dec. |

## आगामी क्लब साप्ताहिक सभा कार्यक्रम

| Date | Program |
|---|---|
| 6 January | Visit to Swargate Metro Station |
| 13 January | AG Visit |
| 20 January | Holiday due to District Conference |
| 26 January | Navardev Movie Premier with Movie team |
| 1 February | DG Visit |

### Result of Weekly Competitions – Event Director Rtn Nukul Dinkar

**Quiz 1: About Freedom Fighter Vinayak Damodar Savarkar's life**
First Prize – PE Sameer Prabhune
Second Prize – IPP Namita Naik
Third Prize – Ann Tanvi Thatte

**Quiz 2: About Freedom fighters**
First Prize – PP Hema Bellad
Second Prize – IPP Namita Naik

**Quiz 3: About Metals**
First Prize – Ann Manisha Tikone
Second Prize – PP Dhananjay Hirve
Third Prize – PP Hema Bellad

## Upcoming District Events… Reserve the dates







